# महात्मा गांधीची ग्रामस्वराज्याची संकल्पना आणि सद्य:स्थिती

**डॉ. प्रविण पांडुरंगराव लोणारकर**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी
मो. नं. – 9518787205

**सारांश**

स्वातंत्र्यप्राप्तीला पंच्याहत्तर वर्ष पूर्ण होत आहेत, भारताची सर्व क्षेत्रात प्रगती सुरू असली तरी, ग्रामीण विकासाची स्थिती आजही समाधानकारक नाही, कारण गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना अजूनही प्रत्यक्षात आलेली दिसत नाही. समाजातील तळागाळातील लोकांचे सक्षमीकरण आणि लोकशाही कार्यपद्धतीत काही प्रमाणात यश प्राप्त झाले असले तरी महात्मा गांधीजींचे स्वप्न पूर्णत: साकार झाल्याचे चित्र दिसत नाही. त्यासाठी पंचायतींना अधिक सक्षम बनवणे गरजेचे आहे. 'नईतालीम' (उद्योग शिक्षण) सारखी अभिनव कल्पना राबविणे आजच्या काळाची गरज आहे.

**मुख्य प्रकाशित घटक**

ग्राम विकास, पंचायत, सामुदायिक विकास, तंटामुक्त गांव मोहिम, रोजगार हमी योजना.

**संशोधनपद्धती**

प्रस्तुत संशोधन पेपरसाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक साधनांऐवजी द्वितियक तथ्य संकलन साधनांचा अवलंब करण्यात आला आहे. यात ग्रंथालयीन साधने, प्रकाशने, इंटरनेट, अहवाल, मासिके आदिंचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाचा उद्देश**

१. महात्मा गांधींची ग्रामस्वराज्याची संकल्पना स्पष्ट करणे
२. महात्मा गांधींची पंचायतीची संकल्पना समजावून घेणे.
३. गांधी प्रेरित पंचायतीच्या संकल्पनेच्या सद्य:स्थितीचा आढावा घेणे

**संशोधन गृहितक**

पंचायतींचे आजचे स्वरूप गांधीजींच्या विचारांवरील वाटचाल दर्शविते.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताची वाटचाल कशी असेल याचा आराखडा गांधीजींनी तयार करून दिला होता. गांधीजींनी तत्कालीन कॉंग्रेससमोर जो अठरा कलमी कार्यक्रम ठेवला होता तोच पुढे भारताच्या विकासाचा राजमार्ग ठरला. भारतीयांच्याद्वारे दिला जाणारा स्वातंत्र्याचा लढा हा केवळ ब्रिटिशांना भारतातून घालवून देण्यासाठीचा नव्हता, तर एक विकसित सर्वसमावेशक समाजाची निर्मिती करण्याचे स्वप्न बाळगणारा होता. त्या स्वप्नाला पूर्ण करण्यासाठी गांधीजींनी जी विकासाची योजना सादर केली तीच ग्रामविकासाची संकल्पना म्हणून ओळखली जाते. भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे राष्ट्राच्या विकासात ग्रामीण भागाची भूमिका महत्त्वाची आहे. राष्ट्राचा विकास तोपर्यंत शक्य नाही जोपर्यंत ग्रामीण जीवनात परिवर्तन घडून येत नाही. त्यामुळे स्वातंत्र्याची चाहूल लागताच महात्मा गांधीनी पहिला नारा दिला तो 'खेड्याकडे चला'. गांधीजींनी या चळवळीला गती देण्यासाठी दूरदर्शीपणे गावांच्या विकासाचा एक सूत्रबद्ध कार्यक्रम तयार केला होता जो आदर्शग्राम संकल्पनेवर आधारित होता.

**गांधीजींचा ग्रामविकासाचा दृष्टीकोन :–**

गांधीजींच्या ग्रामविकासाच्या संकल्पनेवर प्राचीनकालीन भारतात अस्तित्वात असलेल्या पंचायतीचा प्रभाव होता. गांधीजींनी ग्रामविकासाची संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. गावातील लोकांच्या गरजा भागवल्या जाव्यात, प्रत्येक गावात गरजेनुसार उत्पादन आणि मागेल त्याला काम मिळावे अशी व्यवस्था असावी. सामाजिक मालकी, हस्तकला, कुटिरउद्योग, सामुहिक शेतीच्या माध्यमातून गावात उत्पादन घेतले जावे. जमिनीच्या पोतानुसार विविध पिकांची लागवड केली जावी मात्र गांजा, तंबाखू, अफू आदी पिके शेतात पिकवली जाणार नाही. गुरांना चरण्यासाठी कुरण असतील तसेच शेती बरोबर शेतीपुरक उद्योग जसे पशूपालन, दूध उत्पादन आदी केले जाईल. पाण्याची स्वच्छता व पुरवठा पंचायतीची जबाबदारी असेल. पाणवठे सर्वांसाठी खुली असतील. गावाचा कारभार गावातील जुन्याजाणत्या लोकांद्वारे पाहिला जाईल. गावकऱ्यांमध्ये परस्पर सहकार्याची व आपुलकीची भावना असेल. सहकार, सत्याग्रह हा पंचायतीच्या कामाचा मुख्य आधार असेल. गावातील तंटे पंचायती मार्फत सोडवले जावेत मात्र त्यांच्या सोडवणुकीची किंवा निर्णयाची सक्ती केली जाऊ नये. गावाच्या रक्षणाची जबाबदारी ग्रामसुरक्षा दलाकडे असेल व त्यातील लोकांची निवड आळीपाळीने गावातील लोकांमधूनच केली जावी.

गावात जातीभेद, अस्पृश्यता, विषमता, सामाजिक बहिष्कार यांना थारा दिला जाणार नाही. गावात कुठलाही भेदभाव तर केला जाणार नाहीच परंतु विषमता नष्ट करण्यासाठी पंचायती जाणीवपूर्वक प्रयत्न करतील. गावातील लोक उद्योगी असावेत, गावात कुटिरोद्योग व लघुउद्योगांना प्रोत्साहन देण्यात यावे. गावातील ग्रामीणांच्या आरोग्याच्या प्रश्नांवर जनजागरण करण्यात यावे. गावातील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था गावातच असेल तसेच मुलांना खेळण्यासाठी मैदान असेल. या शिवाय समाजाला नवीन पद्धतीने शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी 'नईतालीम' अवलंबावी लागेल. शिक्षण व उद्योगांची सांगड घालावी लागेल. शिक्षणाने स्वावलंबीत्व प्राप्त होणे गरजेचे आहे. रोजगाराची निर्मिती करणारी शिक्षण व्यवस्था अंगीकारावी लागेल. (पारंपरिक उद्योगांचे शिक्षण देणे जसे सुतारकाम, शिल्पकला, हस्तकला, लोहारकाम, शेतीसंबंधी माहिती इत्यादी गांधीजींनी नई तालीम मध्ये अपेक्षित होते.)

**ग्रामपंचायतींची निर्मिती**

महात्मा गांधींच्या ग्राम विकास संकल्पनेत राजकीय विकेंद्रिकरण घटक महत्त्वाचा होता. केंद्र व राज्य सरकार जवळील शक्ती व अधिकारांचे विकेंद्रिकरण करून कनिष्ठ पातळीपर्यंत लोकशाही पोहोचविणे आवश्यक आहे, याबद्दल त्यांचे विचार स्पष्ट होते. गांधीजीं प्रातिनिधिक लोकशाही ऐवजी सहभागी लोकशाही व्यवस्था कशी निर्माण करता येईल या विषयी आग्रही होते. त्यांच्या ग्रामविकासाच्या प्रतिरूपामध्ये स्वयंशासित ग्रामपंचायत केंद्रस्थानी होती. बापूंना प्राचीन काळातील स्वयंपूर्ण व स्वयंशासित गावाच्या निर्मितीची अपेक्षा होती. ज्याप्रमाणे प्राचीन गाव हे एक गणराज्य होते. तशीच आधुनिक गावे देखील असावीत असा त्यांचा आशावाद होता. गावची सत्ता गावातील लोकांच्या हाती असावी. गावाच्या विकासाचा अग्रक्रम गावकऱ्यांनी ठरवावा, योजना बनवावी, निधी उभारावा व लोकसहभागातून कार्यपूर्ण करावीत अशी त्यांची ग्राम विकासाची कल्पना अपेक्षित होती. गांधीजीच्या मते पंचायती प्राचीन काळापासून शासन व्यवस्थेच्या आधार राहिल्या आहेत. यद्यपि ब्रिटिशांनी महसूल वसुलीचे अधिकार काढल्यामुळे व त्यांच्या वसुलीसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केल्यामुळे नष्टप्रत झालेल्या पंचायती पुन्हा निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी गांधीजींनी सांगितलेली काही तत्त्वे पुढीलप्रमाणे.

१. कोणत्याही पंचायतींची निर्मिती प्रांतसरकारच्या परवानगीशिवाय करण्यात येऊ नये.

२. पंचायतीतील सर्व पंचाची निवड विशेष सभा बोलवून गावातील लोकांकडून व्हावी, ही सभा बोलावण्यासाठी ढोल वाजवून दवंडी द्यावी.
३. नवनिर्वाचित पंचायतीला तहसीलची मान्यता घेण्यात यावी.
४. या पंचायतींना फौजदारी न्याय विषयक अधिकार नसावेत.
५. मात्र त्यांना दिवाणी दर्जाच्या खटल्यांना चालविण्याचा अधिकार असावा.
६. कोणालाही पंचायती मार्फत तंटे सोडविण्याची सक्ती केली जाऊ नये.
७. पंचायतींना दंड करण्याचा अधिकार नसावा. तर त्यांनी सामोपचाराने प्रकरणे निकाली काढावीत. नैतिकरित्या सामोपचाराने, पक्षपातविरहित सर्वांना मान्य होईल असे निर्णय द्यावेत.
८. सामाजिक बहिष्कारासारख्या बाबी करू नयेत.
९. पंचायतींनी पुढील कामे करणे अपेक्षित आहे.

- गावातील मुला—मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था
- ग्रामस्वच्छता
- आरोग्य सुविधा
- पाणवठ्यांची स्वच्छता
- अस्पृश्यता निवारण

पंचायती कामांच्या पूर्ततेमध्ये स्थापनेपासून सहा महिन्यात लोकांची मर्जी संपादित करण्यास किंवा कार्य करण्यास अपयशी ठरल्यास त्याची बडतर्फी करावी व प्रादेशिक सरकारने त्या ठिकाणी नव्या पंचायतींची स्थपना करावी.

**ग्रामसेवकाची कार्य**

पंचायतीच्या कार्याची पूर्तता करण्यासाठी ग्रामसेवकाची भूमिका महत्त्वाची असेल. त्याने गावच्या विकासाचे नियोजन अशाप्रकारे करावे की ज्यामुळे शेती आणि ग्रामउद्योगांच्या माध्यमातून गाव स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनेल. तो ग्रामवासियांना आरोग्याचे आणि स्वच्छतेचे शिक्षण व प्रशिक्षण देईल. तसेच तो लोकांचे आरोग्य बिघडणार नाही आणि गावात रोगांची लागण होणार नाही यासाठी अगोदर उपाययोजना करेल. गावातील मुलांच्या शिक्षणाकडेही तो लक्ष देईल शिवाय प्रौढ शिक्षणाची व्यवस्था देखील करेल.

**सद्य:स्थिती**

गांधीजींच्या स्वप्नातील पंचायतीची तीन लाख खेड्यांमध्ये एकाच वेळी निर्मिती करणे स्वातंत्र्यानंतर व्यवाहारिक व आर्थिकरित्या शक्य नव्हते. परंतु ग्रामविकासाच्या संकल्पनेला चालना देण्यासाठी व राज्यांनी आपल्या क्षेमतेनुसार त्यांची निर्मिती करावी यासाठी राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वातील कलम ४० मध्ये त्यांच्या निर्मितीची तरतूद करून ठेवली व राज्यांकडे त्यांच्या निर्मितीची जबाबदारी सोपवली गेली. गांधीजींच्या ग्रामविकासाच्या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्यासाठी विविध योजना सुरू केल्या त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे.

**१. सामुदायिक विकास योजना**

जनसहभागातून ग्रामविकास हा गांधीजींच्या ग्रामविकासाचा पाया होता. तो साध्य करण्यासाठी केंद्र सरकारने सामुदायिक विकास कार्यक्रमाची निर्मिती केली. गांधीजींच्या जन्मदिनी म्हणजे २ ऑक्टोबर १९५२ रोजी या योजनेचा शुभारंभ केला. केंद्र, राज्य, जिल्हा, तालूका व गांव अशा पाच पातळ्यांवर एकाच वेळी या योजनेची रचना करण्यात आली. लोकसहभागातून गावच्या विकासाचा प्राधान्यक्रम ठरविणे, सरकारी

साधन व जनतेचे श्रम यांच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, रोजगार, दळणवळण, बांधकाम, रोजगार प्रशिक्षण अशा विविध कार्यांना पूर्ण करण्यासाठी ध्येय ठरविण्यात आले. या योजनेला अधिक बळ देण्यासाठी राष्ट्रीय विस्तार सेवा या नावाने एक आणखी कार्यक्रम तयार केला गेला व त्याची अंमलबजावणी देखील २ ऑक्टोबर १९५४ पासून करण्यात आली.

**२. पंचायतीची निर्मिती**

बापूंच्या ग्राम स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी निर्माण करण्यात आलेले दोन्ही कार्यक्रम सामुदायिक विकास योजना व राष्ट्रीय विस्तार योजना अपयशी ठरल्यामुळे ग्रामविकासासाठी काय करता येईल याचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती स्थापन केली. त्या समितीच्या शिफारसीप्रमाणे प्रत्येक गावाचा कारभार गावातील लोकांच्या हाती देण्यासाठी एक लोकशाही विकेंद्रिकरण संस्था गावात निर्माण केली गेली. दि. २ ऑक्टोबर १९५९ रोजी राजस्थान मधील नागोर येथे पहिल्या संस्थेचे उद्घाटन करतांना पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी गांधीजींचे पंचायतीचे निर्मितीचे स्वप्न साकार झाल्याचे सांगितले व नव्या संस्थांना ग्रामपंचायत असे संबोधल्याने या नव्या संस्थांना ग्रामपंचायत असे नाव मिळाले. आज गांधीजींच्या ग्रामविकासाची संकल्पना या ग्रामपंचायतीच्या माध्यामातून संपूर्ण भातरतात साकारली जात आहे.

**३. ग्रामसभा**

पंचायतीचा कारभार गावातील लोकांच्या माध्यमातून चालावा. केवळ पंचांची निवड करण्यापूर्ती गावकऱ्यांची भूमिका नसावी तर ती गावातील प्रत्येक कामाच्या निर्धारामध्ये असावी अशी बापूंची अपेक्षा होती. सामुहिक नेतृत्वाची त्यांची संकल्पना होती. त्यातून ग्रामसभेची संकल्पना पुढे आली. आज भारतातील सर्व ग्रामपंचायतीचा कारभार ग्रामसभेच्या माध्यमातून चालवला जातो. महाराष्ट्रात तर एका वर्षात किमान सहा ग्रामसभा घेणे प्रत्येक ग्रामपंचायतीस बंधनकारक केले आहे. त्यातील एक ग्रामसभा गांधी जयंतीच्या दिवशी घेणे अनिवार्य आहे.

**४. ग्रामीण रोजगार हमी योजना**

बापूजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेत मागेल त्याला काम देण्याचे ध्येय होते. ते साध्य करण्यासाठी केंद्र सरकारने २ फेब्रुवारी २००६ साली राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू केली. या योजनेत गावालगत मागेल त्याला किमान शंभर दिवस रोजगार देण्याची तरतुद करण्यात आली. महात्मा गांधींचे स्वप्न साकार होत असल्याने दि. २ ऑक्टोबर २००९ रोजी या योजनेचा नाम विस्तार करून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे नामकरण करण्यात आले.

**५. महात्मा गांधी तंटामुक्त गाव**

महात्मा गांधीची गावातील तंट्याची सोडवणूक गावातच व्हावी अशी अपेक्षा होती. त्यासाठी पंचायतींना दिवाणी स्वरूपाचे तंटे सोडविण्याचे अधिकार द्यावेत असे त्यांचे मत होते. बापूजींचे हे स्वप्न साकार करण्यासाठीचा प्रयत्न महाराष्ट्र सरकारने केला. सर्व ग्रामपंचायतीमध्ये महात्मा गांधीच्या नावे तंटामुक्त मोहिम सुरू केली. प्रत्येक गावात ग्रामपंचायती अंतर्गत एक तंटामुक्त समितीची स्थापना करण्यात आली ज्यामधील सदस्यांची निवड ग्रामसभेच्या माध्यमातून केली जाते. या मोहिमेमुळे गावातील अनेक तंट्यांची सोडवणूक गावातच सामोपचाराने झाली. लोकांचे लाखो रूपये तर वाचलेच शिवाय न्यायालयावरील कामाचा ताण कमी होण्यास मदत झाली. गावात एकोपा, सलोखा व समंजसपणा वाढला.

**विश्लेषण**

महात्मा गांधीची ग्रामविकासाची संकल्पना साकार करण्यासाठी सवातंत्र्यानंतरच्या काळापासून जे प्रयत्न चालू झाले ते आजही सुरू आहेत. राष्ट्रातील परिस्थिती, संसाधनांची उपलब्धता, तंत्रज्ञान, सामाजिक सहकार्य इत्यादी बाबींवर सरकारी योजना व कार्यक्रमांची गती अवलंबून आहे. जलस्वराज्य, ग्रामस्वच्छता अभियान, हागनदारीमुक्त गांव, दारूमुक्ती, तंटामुक्ती इत्यादी सारखे कार्यक्रम राबवून गांधीजींचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाऊ लागला आहे. या सर्वात पंचायतींची निर्मिती हा मैलाचा दगड ठरला असून त्यांच्या मार्फत गांधीजींच्या प्रत्येक स्वप्नांना मूर्त रूप देण्याचा प्रयत्न निरंतरपणे चालूच आहे. तंटामुक्तीने गावात सलोखा वाढला तर हागनदारी मुक्ती व ग्रामस्वछतेतून स्वच्छतेचे महत्त्व गावकऱ्यांना समजले. जलस्वराज्यातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली, अस्पृश्यता निर्मुलन झाले असून दारूबंदीच्या कार्याला वेग मिळाला आहे. गांधीजींच्या रामराज्याची म्हणजेच आदर्शग्रामची संकल्पना साकार करण्याकडे वाटचाल चालू असलेली दिसते.

संदर्भ

१. Village Swaraj, M. K. Gandhi compiled by Vyas H. M. Navjivan Publishing House, Ahmadabad, India, 1962
२. Gandhiji on Villages, Divya Joshi, Published by Mani Bhavan Gandhi Sangrahalaya, Laburnum road, Gamdevi, Mumbai, India, 2002
३. गांधी, नलिनी पंडित, इंडियन एज्युकेशन सोसायटी, बाबरेकर मार्ग,गोखले रोड, दादर, मुंबई, २००६
४. सत्याग्रही—गांधी, डॉ. विश्वास पाठील, गांधी रिसर्च फाऊंडेशन, जैनहिल्स, शिरसोली रोड, जळगाव, २०११
५. संचालक, प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई, महात्मा गांधी वाङमय लोकसंग्रह खंड १३, प्रकाशन १९६७
६. नयी तालीम गांधी प्रणित शिक्षण विषयक प्रयोगांचा इतिहास, प्रा. रमेश पानसे, डायमंड पब्लिकेशन, पुणे
७. ग्रामक्रांतीची दिशा, बाळासाहेब भारदे, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, गांधी भवन, कोथरूड, पुणे २००३
८. मूल्यव्यवस्था: गांधी विचार, चव्हाण, भिसे, जवळगे, निर्मल प्रकाशन, नांदेड, २०१०
९. माझ्या स्वप्नातील ग्रामीण भारत, प्रा. दिनकर बोरीकर, मराठवाडा खादी उद्योग समिती, नांदेड १९९७
१०. लोकराज्य, योजना मासिक प्रसंगिक विशेषांक